The South Asian Academic Research Chronicle ISSN 2454-1109
A Refereed Interdisciplinary Indexed International Open Access Monthly e-Journal
Vol 11.Issue1 & 2; Jan-Feb 2024

# संत तुकारामांची भक्ती चळवळ

**निलेश मधुकर लंगोटे,**
**सहाय्यक प्राध्यापक, मराठी विभाग, न्यू आर्ट्स, कॉमर्स अंड सायन्स कॉलेज, अहमदनगर.**

**प्रस्ताविक :-**

**संत तुकाराम** हे इच्या सतराव्या शतकातील.स. एक वारकरी संत त्यांचा जन्म देहु कवी होते - .माघ शुद्ध पंचमीला झाला-या गावात वसंत पंचमीला पंढरपूरचा विठोबा हे तुकारामांचे आराध्यदैवत होते तुकारामांना वारकरी .'जगद्गुरू' म्हणून ओळखतातवारकरी संप्रदायातल्या प्रवचन व कीर्तनाच्या . - शेवटी'पुंडलीक वरदे हरी विठ्ठल, श्री ज्ञानदेव तुकाराम, पंढरीनाथ महाराज की जय, जगद्गुरू तुकाराम महाराज की जय' असा जयघोष करतात .लोककवी होते जगद्गुरू तुकाराम .'जे का रंजले गांजलेत्यासी म्हणे जो आपु !ले तोचि साधू ओळखावा!देव तेथेची जाणावा !' अशा प्रकारचे अभंग संत तुकाराम महाराजांनी जनसामान्यांना सांगून ईश्वर भक्तीचा सुगम मार्ग दाखवलावारकरी संप्रदायाची . शतकामध्ये सामाजिक प्रबोधनाचे मुहूर्तमेढ रोवणारे सतराव्या .अखंड परंपरा त्यांनी निर्माण केली सुधारक संत म्हणून तुकाराम महाराजांचा उल्लेख केला जातोतुकाराम महाराज वास्तववादी निर्भीड . आणि वेळप्रसंगी समाजातील दांभिकपणावर रोखठोक शब्दांमध्ये प्रहार करणारे संत होते. अशा काळात संत तुकारामांनी आपल्या साहित्यातून व कीर्तनांतून समाजाला अचूक मार्गदर्शन करण्याचे कार्य केले

तुकाराम महाराज हे साक्षात्कारी व निर्भीड संत कवी होतेवेदान्त तुकोबांच्या अभंगवाणीतून . .सामान्य जनांपर्यंत प्रवाहित झाला'अभंग म्हटला की तो फक्त तुकारामाचाच' एवढी लोकप्रियता त्यांच्या अभंगांना मिळालीसंत तुकारामांची भावकविता म्हणजे अभंग ., हे अभंग महाराष्ट्राच्या सांस्कृतिक परंपरेचे महान द्योतक आहेतवारकरी ., ईश्र्वरभक्त, साहित्यिक, अभ्यासक व सामान्य रसिक आजही त्यांच्या अभंगांचा अभ्यास करतातत्यांचे अभंग खेड्यांतील अशिक्षित लोकांच्याही . .त आहेतनित्य पाठां

भागवत धर्माचा कळस होण्याचे महद्भाग्य त्यांना लाभलेमहाराष्ट्राच्या हृदयात अभंगरूपाने . .मंत्रांचे पावित्र्य शब्दकळेत पाझरते .त्यांच्या अभंगांत परतत्त्वाचा स्पर्श आहे .ते स्थिरावले आहेत काव्यातील गोडवा व भाषेची रसाळता त्यांच्या .त्यांची प्रत्यक्षानुभूती त्यांच्या भावकाव्यात आहे संत तुकाराम म .अतुलनीय आहेहाराजांनी आपल्या अभंगलेखनाबरोबरच गवळणीही रचल्या आहेत.

संत तुकारामांच्या अभंगाचा अनेकांनी अनेक अंगानी अभ्यास करून त्यांचे सौंदर्य उलगडण्याचा प्रयत्न केला आहेम्हणून जनसामान्यांच्या मुखांमध्ये महाराजांची गाथा ही अखंड ज्ञानाचा स्रोत . गाथा बुडवली म्ह .कायम आहेणणाऱ्यांना जनसामान्यांच्या तोंडून मुखोद्गत अभंग ऐकून गाथा जिवंत असल्याचा प्रत्यक्ष अनुभव झालाइंद्रायणी नदीच्या काठावर लाखोंचा जनसमुदाय गाथेतील अभंग . की आपले अभंग म्हणू लागले यावेळी तुकाराम महाराजांना जाणीव झाली, आपली गाथा बुडालेली नाहीतर ती जनसामान्यांच .्या मुखांमध्ये अखंड जिवंत आहेआपल्या कार्याची ही खरी यथोचित . बहुजन समाजाला जागृत .खऱ्या अर्थाने संत तुकाराम हे या काळातील लोक संत होते .पावती आहे

देव धर्मातील अनागोंदी .ते यशस्वी ठरले करून देवधर्म यासंबंधी मते लोकांना पटवून देण्यामध्ये त्याचप्रमाणे भोळ्यासमजुती प्रयत्नपूर्वक नष्ट करण्याचा त्यांनी प्रयत्न केलासमाजमनावरील . अंधश्रद्धेचा पगडा दूर करून लोकांना नवा धर्म, नवी भाषा देण्याचं काम संत तुकारामांनी केलेसंत . त्यांचे अभंग मानवी .धन आजही समाजाला मार्गदर्शक ठरलेले आहेतुकारामांचे धर्मक्रांतीचे समाज प्रबो जीवनाला उपकारक ठरले आहेत लौकिक अर्थाने संत तुकाराम हे आठव्या पिढीतील नायक होते . ज्ञानदेवांनी रचलेल्या भक्ती चळवळीला खऱ्या अर्थाने कळसास नेण्याचे काम हे संत तुकारामांनी केलेले आहे.

**भक्ती या शब्दाचा अर्थ :-**

संस्कृत मध्ये भक्तिचा शाब्दिक अर्थ आहे संलग्नता", सहभाग, प्रेम, श्रद्धा, श्रद्धा, प्रेम, भक्ती, उपासना, शुद्धता". हे मूळतः हिंदू धर्मात वापरले गेले होते, वैयक्तिक देव किंवा भक्ताद्वारे प्रस्तुत देवासाठी भक्ती आणि प्रेमाचा प्रयत्नासाठी प्रेम असा होतोतर . भगवद्गीतेमध्ये, भक्तीमार्गाप्रमाणेच, अध्यात्माच्या आणि मोक्षाच्या संभाव्य मार्गांपैकी एकाचा अर्थ आहे.

भारतीय धर्मांमधील भक्ती ही आहे "भावनिक भक्ती", विशेषतः वैयक्तिक देव किंवा आध्यात्मिक कल्पनांबद्दल असतेअशा प्रकारे ., भक्तीसाठी भक्त आणि देवता यांच्यातील नाते आवश्यक आहे. भक्ती विचारांनी भारतातील अनेक लोकप्रिय ग्रंथ आणि संत .कवींना प्रेरणा दिली आहे-हरणार्थउदा, भागवत पुराण, हिंदू धर्मातील भक्ती चळवळीशी संबंधित कृष्णाशी संबंधित मजकूर आहे.

**भक्ती चळवळ :-**

भक्ती चळवळ ही हिंदू संतांनी धार्मिक सुधारणा घडवून आणण्यासाठी भक्ती पद्धतीचा अवलंब करून मोक्षप्राप्तीकरिता सुरू केलेली क्रांती होती . त्यांच्या या चळवळीने भक्तांना वेयक्तिक देवाबद्दल आणि देवाला भक्तांबद्दल असलेल्या परस्पर आणि तीव्र भावनिक जोड आणि प्रेमयावर भर दिला. भक्ती म्हणजे उपासना करण्याची कला आहे. भक्ती चळवळ ही एक सामजिक धार्मिक सुधारणा आहे. जी भारतीय समाजातील जातीय भेद, अंधश्रद्धा दूर करण्याच्या विचाराने सुरू झाली . जरी भक्ती पंथ ही एक व्यापक चळवळ होती

**संत तुकाराम यांच्या अभंगातून भक्ती चळवळ माणसाला उद्देशून म्हणतात:-**

संत तुकाराम हे भारतातील भक्ती चळवळी दरम्यान एक प्रमुख वारकरी संत आणि आध्यात्मिक कवी होते ते .१७ व्या शतकातील हिंदू कवी आणि महाराष्ट्र भारत मधील भक्ती चळवळीचे संत होते संत तुकाराम महाराज .त्यांच्या भक्तीमय अभंगांसाठी आणि कीर्तनासाठी समाजाभिमुख उपासना म्हणून परिचित आहेतसंत तुकाराम .त्यांचे अभंग विठोबाला समर्पित होते . संत तुकोबा .महत्त्व आहे भारतीय समाजाच्या सांस्कृतिक उन्नतीमध्ये संतसाहित्याला अनन्यसाधारण हे एक महान समाजसुधारक, तत्वचिंतक कवी होते.

**चाल केलासी मोकळा | बोल विठ्ठल वेळोवेळा |**
**तुजं पाप चि नाही ऐसे। नाम घेतां जवळी वसे ।। ) अभंग गाथा क्र.११० (**

याचा अर्थ तुकाराम महाराज सांगतात की, तू परमेश्वराचे नामस्मरण करपरमेश्वराचे जेव्हा . नामस्मरण करशील,त्यावेळेला कोणतेही पाप तुझ्या ठिकाणी उरणार नाहीपाप कसं नाहीसं होईल . याची काळजी तू करू नकोस, कारण हरिनामापुढे पाप टिकणारंच नाही .ते आपोआपच नष्ट होईल . सामर्थ्य त्या परमेश्वर तुझ्याबरोबर असेल तर तुझ्या हातून कुठलेही पापकर्म तो घडू देणार नाही एवढे .हरिनामात आहे माणसाची भक्ती कशी असावी हा उपदेश करत आहे .

**नये जरी तुज मधुर उत्तर । दिधला सुस्वर नाहीं देवें ॥१॥**
**नाहीं तयाविण भुकेला विठ्ठल । येईल तैसा बोल रामकृष्ण ॥धृ॥.**
**देवापाशीं मागें आवडीची भक्ति । विश्वासेंशीं प्रीति भावबळें ॥२॥**
**तुका म्हणे मना सांगतों विचार । धरावा निर्धार दिसेंदिस ॥३॥) अभंग गाथा क्र(२.**

या अभंगातून देवाने गोड स्वर दिला नसला, मला गोड गळ्याने तुझे स्वर गाता येत नसले तरी काही हरकत नाही. विठ्ठल त्या वाचून भूकेला नाही जसा जमेल तसा हा मंत्र जप "राम कृष्ण" श्रद्धेने., निष्ठेच्या बळाने व प्रेमाने देवाची भक्तिपूर्ण आळवनि कर तुकाराम.महाराज म्हणतात हे मना तुला मी सांगतो ते तू ऐक की हरी विषयी तू दृढ निर्धार धर संत तुकाराम "राम कृष्ण" याचे नामस्मरणाचे महत्व पटवून देत आहे .

**अंतरिचीं घेतो गोडी । पाहे जोडी भावाची ॥१॥**
**देव सोयरा देव सोयरा । देव सोयरा दीनाचा ॥धृ॥.**
**आपुल्या वैभवें । शृंगारावें निर्मळे ॥२॥**
**तुका म्हणे जेवी सवें । प्रेम द्यावें प्रीतीचें ॥३॥) अभंग गाथा क्र. ५(**

संत तुकाराम या अभंगातून परमेश्वर भक्ताच्या अतःकरणातील भक्तिचि गोडी स्विकारतो आणि त्याच्या अतःकरणातील भाव पाहतो देव भक्ताचा सोयरा झालेला असतो असे महाराज तीन . .वेळा म्हणतात आपुल्या जवळ जे वैभव आहे मग ते कसे का असेना पण ते वैभवाच निर्मळमानाने देव समजावे. तुकाराम महाराज म्हणतात तो हरी भक्तांबरोबर भोजन करतो व त्याच्यावर आपल्या प्रेमाचा वर्षाव करावा . येथे भक्ती कशी असावी याचा उपदेश करतात.

**हरिच्या जागरणा । जातां कां रे नये मना ॥१॥**
**कोठें पाहासील तुटी । आयुष्य वेंचे फुकासाठी ॥२॥**
**ज्यांची तुज गुंती । ते तों मोकलिती अंतीं ॥२॥**
**तुका म्हणे बरा । लाभ काय तो विचारा ॥३॥ )अभंग गाथा क्र. १२(**

संत तुकाराम या अभंगातून हरिचे नामस्मरण करने, भक्ति करने हे तुझ्या मनात का बरे येत नाही? .या संसारामधे तुझे जीवन व्यर्थ जात आहे, ती तूट भरून निघणार नाही ज्यांच्यासाठी तू . आपले आयूष्य व्यर्थ घालवित आहे, ते तुला शेवट पर्यंत साथ देणार नाहीत. तुकाराम महाराज म्हणतात , की तू आपल्या जीवनाचे सार्थक कश्यामध्ये आहे याचा विचार कर . नामस्मरणाचा विचार व महत्व पटवून देतात .

**ब्रम्हादिक जया लाभासि ठेंगणे । बळिये आम्ही भले शरणागत ॥१॥**
**कामनेच्या त्यागें भजनाचा लाभ । जाला पद्मनाभ सेवाॠणी ॥धृ॥.**
**कामधेनूचिया क्षीरा पार नाहीं । इच्छेचिये वाही वरुषावे ॥२॥**
**बैसलिये ठायीं लागलें भरतें । त्रिपुटीवरतें भेदी ऐसें ॥३॥**
**हरी नाहीं आम्हां विष्णुदासां जगीं । नारायण अंगीं विसावला ॥४॥**
**तुका म्हणे बहु लाटे हें भोजन । नाहीं रिता कोण राहत राहों ॥५॥ )अभंग गाथा क्र. १९(**

संत तुकाराम या अभंगातून ब्रम्हादिक देवसुद्धा ज्या भक्तिप्रेमाच्या लाभाला पारखे झाले, तो लाभ आम्हाला मिळाला आहे आम्ही परमेश्वराला शरणागत आम्ही आहोत, म्हणून बलवान आहोत आम्ही विषय वासनेचा त्याग केल्यामुळे या भजनांचा लाभ आम्हाला झाला आहे.. आमच्या भक्ति मुळे हा परमेश्वर आमचा ऋणी झाला आहे.कामधेनुच्या दुधला अंत नाही , याचकाच्या मर्जी प्रमाणे ती त्याला दुग्धपान देत असते, तसा परमेश्वर भक्ताच्या इच्छेला मान देत असतो परमेश्वरप्रेमाचे . असे भरते आमच्या मनामधे निर्माण झाले आहे,की त्यामुळे त्रिपुटिंचाहि भेद करता येतो आमच्या . ठिकाणी परमेश्वराचा वास आसल्यामुळे आम्हाला हार मनण्याची माहित नाही; कारण आम्ही विष्णुदास आहोत या भक्तिप्र.ेमाच्या भोजनामुळे विचारी मनुष्य उपवाशी राहत नाही अविचारी मनुष्य भक्तिप्रेमाला मुकला आहे . संत तुकाराम या अभंगातून सामन्य व्यक्तीला भक्ती चा मार्ग सांगत आहे.

**विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म । भेदाभेदभ्रम अमंगळ ॥१॥**
**अइका जी तुम्ही भक्त भागवत । कराल तें हित सत्य करा ॥धृ॥.**
**कोणा ही जिवाचा न घडावा मत्सर । वर्म सर्वेश्वरपूजनाचें ॥२॥**
**तुका म्हणे एका देहाचे अवयव । सुख दुःख जीव भोग पावे ॥३॥ )अभंग गाथा क्र. २१(**

संत तुकाराम या अभंगातून हे जग विष्णुमय आहे, वैष्णव हा एकच धर्म सर्वत्र आहे, माणसामाणसांमध्ये भेद करने ही अमंगल बाब आहे हे भक्तजनहो., तुम्ही भगवंतचे श्रवण, चिंतन करून आपले हित साधुन घ्या कोण्याही जीवांचा मत्सर घडू नये आपल्या हातून., हीच खरी ईश्वर भक्ति आहे तुकाराम महाराज म्हणतात., की शरीच्या कुठल्याही अवयवाला दुःख झाले तर ते संपुर्ण शरीराला, तसेच शरीरातील जीवाला जाणवते त्याप्रमाणे विष्णुमय जगातील कोणत्याही जीवाचा मत्सर आपल्या हातून घडला असता तो इश्वराचा मत्सर केल्यासारखा आहे . तुकाराम महाराज निरुगुन भक्तीचे महत्व पटवून देत आहे.

**जन विजन जालें आम्हां । विठ्ठलनामा प्रमाणें ॥१॥**
**पाहें तिकडे बापमाय । विठ्ठल आहे रखुमाई ॥धृ॥.**
**वन पट्टण एकभाव । अवघा ठाव सरता जाला ॥२॥**
**आठव नाहीं सुखदुःखा। नाचे तुका कौतुकें ॥३॥ )अभंग गाथा क्र. २४(**

संत तुकाराम या अभंगातून भक्तीचेप्रेम प्राप्त झाल्यामुळे जन आणि अरण्य आम्हाला समान भासते जनात आणि. रखमाईच दिसते-जिकडे पहावे तिकडे आम्हाला विठ्ठल.वनात आम्हाला काहीच फरक जाणवत नाही; कारण माझे मन देहावर नाही सर्वत्र माझी समदृष्टी झाली आहे . तुकाराम महाराज म्हणतात मी विठ्ठलाच्या नामसंकीर्तनामधे तन्मय झालो त्यामुळे मला सूखदुःखाची आठवनहि राहत नाही . तुकाराम महाराज एक चित्ताने भक्ती करण्यास सांगतात .

**सदा तळमळ । चित्ताचिये हळहळ ॥१॥**
**त्याचें दर्शन न व्हावें । शव असतां तो जिवे ॥धृ॥.**
**कुशब्दाची घाणी । अमंगळविली वाणी ॥२॥**
**नेणे शब्द पर । तुका म्हणे परउपकार ॥३॥ )अभंग गाथा क्र. ३३(**

संत तुकाराम या अभंगातून ज्याच्या चित्तामधे प्रपंच्याची सतत हळहळ, तळमळ चालु असते, .त्याचे मला दर्शनहि होउ नये, तो जिवंत असुनही मेल्यासारखा आहे. ज्याच्या मुखी नेहमी कुशब्द, अश्लील शब्द असतात, ती अमंगल वाणी माझ्या कानी पडू नये . तुकाराम महाराज म्हणतात जो दुसऱ्याशी कधीच चांगले बोलत नाही, जो कोणावरही परउपकार करत नाही, अश्या मनुष्याचे दर्शन घेण्याची माझी इच्छा नाही. तुकाराम महाराज मनुष्याच्या सामन्य विचारा बद्दल उपदेश करतात

**करावी ते पूजा मनेचि उत्तम । लौकिकाचें काम काय असे ॥१॥**
**कळावें तयासि कळे अंतरींचें । कारण तें साचें साच अंगीं ॥धृ॥.**
**अतिशया अंतीं लाभ किंवा घात । फळ देतें चित्त बीजा ऐसें ॥२॥**
**तुका म्हणे जेणें राहे समाधान । ऐसें तें भजन पार पावी ॥३॥ )अभंग गाथा क्र. ४६(**

संत तुकाराम या अभंगातून देवाची पूजा करायची असेल तर मनोभावे करावे चांगल्याप्रकारे करावे तेथे उगाचंच पूजेचे साहित्य वगैरे ठेवून पूजा करायचा लौकिक दाखवायचे त्याचा काय उपयोग आहे?आपल्या अंतःकरणातील खरी पूजा ज्याला कळायला पाहिजे त्या देवाला आपल्या अंतःकरणातील खरा भक्तिभाव समजतो कारण भक्ताच्या अंतःकरणातील सत्य भाव देव ओळखतो व तेच त्याला आवडते. काहीतरी उगाचच आगोचर पने कर्म केले तर त्याच्या पासून एकतर लाभ तरी होतो किंवा घात तरी होतो जसे बीज असेल तसे फळ मिळते त्या प्रमाणे ज्या व्यक्तीच्या चित्ता मध्ये जसे असेल तसा त्याला लाभ होतो. तुकाराम महाराज म्हणतात ज्या भजनाने आपले अंतकरण समाधान पावते असे भजन आपल्याला भवसागरच्या पलीकडे पोहोचवत असते. तुकाराम महाराज भक्ती चा मार्ग उपदेश करतात .

**न ये नेत्रां जळ । नाहीं अंतरीं कळवळ ॥१॥**
**तों हे चावटीचे बोल । जन रंजवणें फोल ॥धृ॥.**
**न फळे उत्तर । नाहीं स्वामी जों सादर ॥२॥**
**तुका म्हणे भेटी । जंव नाहीं दृष्टादृष्टी ॥३॥ )अभंग गाथा क्र. ५७(**

संत तुकाराम या अभंगातून ज्याच्या नेत्रांमध्ये परमेश्वराबद्दल प्रेमाने पाणी येत नाही, ज्याच्या अंतरि भक्तीचि तळमळ नाही . त्याचे बोल हे वृथा लोकांना रंजविणारे असतात आणि असे रंजक .

ज्याच्या मना मध्ये आपल्या स्वामी हरी. बोल निष्फळ ठरतात,गुरु विषयी आदर नसतो त्यांनी उपदेश फल्द्रुप होत नाहीतुकाराम महाराज म्हणतात .,जो पर्यंत समोरा समोर भेट होत नाही तो पर्यंत आम्ही भेटलो म्हणणे उपयोगाचे नाही . तुकाराम महाराज मनुष्याची भक्ती ही तळमळीनी करावी उपदेश करत आहे.

**वळितें जें गाई । त्यासि फार लागे काई ॥१॥**
**निवे भावाचे उत्तरीं । भलते एके धणी वरी ॥धृ॥.**
**न लगती प्रकार । कांहीं मनाचा आदर ॥२॥**
**सांडी थोरपणा । तुका म्हणे सवें दीना ॥३॥ )अभंग गाथा क्र. ६०(**

संत तुकाराम या अभंगातून गाईगुरे वळणाऱ्या गुराख्याला परमेश्वर भक्ती करण्यासाठी कष्ट -. करावे लगत नाही त्यांना कर्मकांडाची आवशकता भासत नाही त्याच्या मनातील भक्तिभाव व शुद्ध आचरण पाहुन परमेश्वर त्याच्यावर प्रसन्न होतो ही परमेश्वराला वश करुण घेण्यासाठी कोणत्या. तुकाराम महाराज म्हणतात. दिखाऊ पणाची त्यांना गरज नसते, जो आपला अहंकार, मनपान, मोठेपणा विसरून हरीला शरण जातो, त्याला परमेश्वर वश होतो . मनुष्याच्या मनात भक्तीविषयी चितन करण्यास सांगतात .

**भक्तऋणी देव बोलती पुराणें । निर्धार वचनें साच करीं ॥१॥**
**मागें काय जाणों अइकिली वार्ता । कबिर सातें जातां घडया वांटी ॥धृ॥.**
**माघारिया धन आणिलें घरासि । ने घे केला त्यासि त्याग तेणें ॥२॥**
**नामदेवाचिया घरासि आणिलें । तेणें लुटविलें द्विजां हातीं ॥३॥**
**प्रत्यक्षासि काय द्यावें हें प्रमाण । व्यंकोबाचें ऋण फेडियेलें ॥४॥**
**बीज दळोनियां केली आराधना । लागे नारायणा पेरणें तें ॥५॥**
**तुका म्हणे ऐसा नाहीं ज्या निर्धार । नाडेल साचार तोचि एक ॥६॥ )अभंग गाथा क्र. ६७(**

संत तुकाराम या अभंगातून देव भक्तांचा ऋणी आहे, भक्तांनी आपल्या भक्तीने त्याला बांधून टाकले आहे, असे पुराणाने सांगितलेले आहे पूर्वीची अशी गोष्ट सांगितली., की संत कबीरांनी विणलेली वस्त्रे बाजारात नेउन वाटली तेव्हा एक माणूस वस्त्रा साठी विणवनी करीत असताना कबीरांनी आपल्या आंगावरील अर्धे वस्त्र त्याला दिले तो वस्त्रहीन मनुष्य साक्षात परमेश्वर होता संत नामदेवांना पण . या सर्व प्रत्यक्ष घडलेल्या कथा . चेही धन परमेश्वराने ब्राम्हणाकडून लुटविलेअसाच अनुभव अला त्यां आहेत, एकनाथांच्या भक्तीचे ऋण फेडण्यासाठीसुध्दा विठ्ठलाने नाथांच्या घरी पानी भरले, कष्ट केले . शेतात पेरण्यासाठी आलेले बी दळून नाथांचे पणजे संत भानुदासांनी संतांना भोजन दिले . तुकाराम महाराज म्हणतात, माझ्या विठ्ठला बद्दल ज्याला प्रेम नाही, तो या भवसागरातून पार पडू शकत नाही. संत तुकाराम मनुष्याला देव भक्तीचा भुकेला आहे उपदेश करतात

**भोरप्यानें सोंग पालटिलें वरी । बक ध्यान धरी मत्स्या जैसें ॥१॥**
**टिळे माळा मैंद मुद्रा लावी अंगीं । देखों नेदि जगीं फांसे जैसे ॥धृ॥.**

**ढीवर या मत्स्या चारा घाली जैसा । भीतरील फांसा कळों नेदी ॥२॥**

**खाटिक हा स्नेहवादें पशु पाळी । कापावया नळी तया साठीं ॥३॥**

**तुका म्हणे तैसा भला मी लोकांत । परी तूं कृपावंत पांडुरंगा ॥४॥ )अभंग गाथा क्र. ६९(**

संत तुकाराम या अभंगातून बहुरूपी वरवर विविध सोंग घेऊन दखवितो अथवा बगळा मासा पकडण्यासाठी डोळे बंद असल्याचे सोंग करतो त्या प्रमाणे भक्तीचे ढोंग करणारा टिळा., माळ, मुद्रा लाऊन जगाला फसवित असतो . कोळी मासे पकडण्याआधी गळाला खाद्य लावतो, त्या खादयामधील फासा माश्याला समजून येत नाही तुकाराम . ला कापण्याआधी प्रेमाने पाळत असतोखाटिक बकऱ्या. महाराज म्हणतात, हे देवा, तू माझा अव्हेर करू नको; कारण तू दयाळू, प्रेमळ असा तारणहार आहेस . संत तुकाराम या अभंगात भक्ती भोंदूगिरी सारखी नसावी हा उपदेश करतात

**विश्वाचा जनिता । म्हणे यशोदेसि माता ॥१॥**

**ऐसा भक्तांचा अंकित । लागे तैसी लावी प्रीत ॥धु॥.**

**निष्काम निराळा । गोपी लाविंयेल्या चाळा ॥२॥**

**तुका म्हणे आलें । रूपा अव्यक्त चांगलें ॥३॥ )अभंग गाथा क्र. ७८(**

संत तुकाराम या अभंगातून या विश्वाचा जनक यशोदेला माता म्हणतो तो भक्तांचा अंकित . आहे, भक्ताला त्याच्या भक्तीप्रमाणे प्रेम देत असतो परमेश्वर निष्काम असूनही गोपीनां त्याचा वेध . . लागला आहे तुकाराम महाराज म्हणतात, आपल्या भक्तीसाठी तो अव्यक्त असुन व्यक्त, सगुन साकार रूपामधे आला आहे . सामन्य माणसाने भक्ती सगुण विचाराने करावी उपदेश करतात.

**जेणें घडे नारायणीं अंतराय । होत बाप माय वर्जावीं तीं ॥१॥**

**येर प्रिया पुत्र धना कोण लेखा । करिती तीं दुःखा पात्र शत्रु ॥धु॥.**

**प्रल्हादें जनक बिभीषणें बंधु । राज्य माता निंदु भरतें केली ॥२॥**

**तुका म्हणे सर्व धर्म हरीचे पाय । आणीक उपाय दुःखमूळ ॥३॥ )अभंग गाथा क्र. ८३(**

संत तुकाराम या अभंगातून नारायणाचि भक्ती करतांना प्रत्यक्ष जन्मदाते बाप माय जरी आड आले तरी त्यांना दूर सारावे पत्नी., पुत्र, धन यांनाही पमार्थापासून दूर ठेवावे, परमार्थ मार्गात आड येणारे सर्व शत्रु आहेत प्रल्हादाने आपल्या माता पित्यांचा ., बिभीषणाने बंधू रावणाचा, भरताने माता कैकेयीचा त्याग करून परमार्थ साधला तुकाराम महाराज म्हणतात., सर्वधर्म हरिच्या पायाशी असतांना इतर केलेले उपाय म्हणजे दुःखाचें मूळ आहेत . तुकाराम महाराज सामन्य माणसाला भक्तीत आडवे येणाऱ्या बाजूला करून भक्ती केली पाहिजे हा संदेश देतात.

**थोडें आहे थोडें आहे । चित्त साह्य जालिया ॥१॥**

**हर्षामर्ष पाहीं अंगीं । पांडुरंगीं सरलें तें ॥धु॥.**

**अवघ्या साधनांचें सार । न लगे फार शोधावें ॥२॥**

**तुका म्हणे लटिकें पाहें । सांडीं देह अभिमान ॥३॥ )अभंग गाथा क्र. ८५(**

संत तुकाराम या अभंगातून भक्तिमार्गाची वाटचाल करतांना मनाची परमेश्वराला एकरूपता साधली पाहिजे हर्ष आणि खेद हे दोन्ही ज्यांना सामान भासतात., तेच भक्तीचे अधिकारी होतात सर्व .

भक्तीमार्गाचे सार एकच आहे, ते फारसे शोधवे लागत नाही तुकाराम महाराज म्हणतात., हा प्रपंच खोटा आहे, हे ओळखून अहंकार, देहसक्तीचा त्याग म्हणजेच परमार्थ होय . संत तुकाराम भक्ती मार्ग सांगतात .

**आतां उघडीं डोळे । जरी अद्यापि न कळे । तरी मातेचिये खोळे । दगड आला पोटासी ॥१॥**
**मनुष्यदेहा ऐसा निध । साधिली ते साधे सिद्ध । करूनि प्रबोध । संत पार उतरले ॥धृ॥.**
**नाव चंद्रभागे तीरीं । उभी पुंडलीकाचे द्वारीं । कट धरूनियां करीं । उभाउभी पालवी ॥२॥**
**तुका म्हणे फुकासाठीं । पायीं घातली या मिठी । होतो उठाउठी । लवकरीच उतार ॥३॥**
**(अभंग गाथा क्र. ८६)**

संत तुकाराम या अभंगातून मायामोहाने भ्रमीष्ट झालेल्या जीवा,आता तरी तू डोळे उघड, मातेच्या उदारतुन तू जन्म घेऊन तु फक्त दगड आहेस . हा मनुष्य देह तुला मिळालेला आहे त्याचे तू सार्थक करून घे, संतांनी जसा भक्तिचा मार्ग धरला आणि ते भवसागरातून तरले , तसा तू भक्तिमार्ग धरुण नारादेहाचे सार्थक करुन घे . हा भवसागर तरुन जाणारी नाव चंद्रभागेतीरि, पुंडलिकाच्या द्वारी कमरेवर हात ठेऊन उभी आहे, उभ्या उभ्या ती सर्वांना बोलविते आहे . तुकाराम महाराज म्हणतात या नावेला कुठालेही मोल द्यावे लागत नाही, अनन्य भावाने त्याला शरण जाणे, हा एकच उपाय या भवसागरातून तरुण जाण्यासाठी आहे . संत तुकाराम मनुष्याला भक्तीमय जीवन जगण्यासाठी उपदेश करतात.

**पंढरीचा महिमा । देतां आणीक उपमा ॥१॥**
**ऐसा ठाव नाहीं कोठें । देव उभाउभी भेटे ॥धृ॥.**
**आहेति सकळ । तीर्थे काळें देती फळ ॥२॥**
**तुका म्हणे पेठ । भूमिवरी हे वैकुंठ ॥३॥ (अभंग गाथा क्र. ८८)**

संत तुकाराम या अभंगातून पंढरी या तीर्थक्षेत्राचा महिमा किती वर्णन करावा तेवढा थोडाच आहे या सारखे ठिकाण दुसरे कोठेही नाही करण येथे भक्तांना भेटण्यासाठी देव आतुर होऊन उभा . तुकाराम महाराज म्हणता. च कालानंतर फळ देणारी आहेइतर क्षेत्र बऱ्या. राहिला आहेत, पंढरी ही साक्षात भक्तीची बाजार पेठ व भुमीवरिल वैकुंठच आहे संत तुकाराम या अभंगातून भक्तीतून पंढरीमहत्मा विषयी उपदेश करतात .

**तीर्थी धोंडा पाणी । देव रोकडा सज्जनीं ॥१॥**
**मिळालिया संतसंग । समर्पितां भलें अंग ॥धृ॥.**
**तिर्थी भाव फळे । येथें आनाड तें वळे ॥२॥**
**तुका म्हणे पाप । गेलें गेल्या कळे ताप ॥३॥ (अभंग गाथा क्र. ८९)**

संत तुकाराम या अभंगातून सर्व तीर्थक्षेत्रांवर दगाडाचा देव व तीर्थाचे पाणी दिसते; पण तुकाराम महाराजांना संतसज्जनांमधे देव दिसतो . अश्या संतांचा सहवास मिळाला तर तिथे देहहि अर्पण करावा . तीर्थस्नानाने पापक्षालन होत नाही जर मनामधे भक्ति भावना असेल तरच तीर्थक्षेत्री त्याचे फळ मिळते, म्हणून संतसज्जन नास्तिक लोकांना आपल्या संगतित बदलून टाकतात तुकाराम .

महाराज म्हणतात, संतसज्जनांमधे राहून की एकदा पाप गेले मग जीवनातील त्रिविध ताप नाहिसे ज़ाले हे माहित होते . संत तुकाराम सामन्य मनुष्याला भक्ती केली तरीही जीवनातही यश मिळते हा उपदेश करतात.

**घेऊनियां चक्र गदा । हाचि धंदा करीतो ॥१॥मनुष्याची**
**भक्ता राखे पायापासीं । दुर्जनासी संहारी ॥धु॥.**
**अव्यक्त तें आकारलें । रूपा आलें गुणवंत ॥२॥**
**तुका म्हणे पुरवी इच्छा । जया तैसा विठ्ठल ॥३॥ )अभंग गाथा क्र. ९०(**

संत तुकाराम या अभंगातून हातामधे चक्र, गदा घेऊन देव सतत भक्ताचे रक्षण करण्याचा धंदा करत असतो. भक्तांचे रक्षण करुण त्यांना आपल्या पायजवर स्थान देतो; पण दुष्टांचा मात्र नाश करतो भक्तांसाठी तो अव्यक्त रूपातुन.व्यक्त रुपात येतो . तुकाराम महाराज म्हणतात, भक्तांच्या सर्व इच्छा तो पूर्ण करतो . संत तुकाराम म्हणतात की, भक्ताचा देव भुकेला असतो हा उपदेश करतात.

**समारोप :-**

संत तुकारामांनी त्यांच्या अभंगातून विवध चितन मांडतात. संत तुकारामांनी भक्ती विषयी अभंग रचना वरील प्रमाणे केली आहे. त्यांच्या अभंगातून नामस्मरण, “राम कृष्ण” मंत्राचे नामस्मरनाचे महत्व , भेद-भेदा महत्व , भक्तीची तळमळ , भक्तीची दृष्टीकोन , भक्ती ही खरी असावी भामटी नसावी, भक्ती सगुण- निरुगुन भक्ती करावी, पंढरीमहात्म, तीर्थक्षेत्र भेटीचे वर्णन करणारे अभंग, भक्ती ही रक्षण करणारे साधन आहे. अशा प्रकारे संत तुकाराम यांच्या अभंगातून वारकरी संप्रदायात भक्ती विषयी चळवळ करताना दिसतात.

संदर्भ ग्रंथ :-

१. डॉ . पल्हाद जोशी, ‘ तुकाराम गाथा’, श्रीराम बुक डेपो ग्रंथ प्रकाशन , मुंबई ४ प्रथम आवृत्ती १९६८.
२. दि. पु .चित्रे , ‘पुन्हा तुकारम ’, एस.के.बेलवलकर पब्लिशिंग कंपनी , पुणे प्रथम आवृत्ती१९९०.
३. डॉ . सदानंद मोरे, ‘तुकारम दर्शन’,गाज प्रकाशन, अहमदनगर , प्रथम आवृत्ती१९९६.
४. शंकर वासुदेव अभ्यंकर,संत तुकाराम, आदित्य प्रतिष्ठान, पुणे, प्रथम आवृत्ती -२००८
५. ल रा. नसिराबादकर, ‘प्राचीन मराठी वाड्मयाचा इतिहास’, फडके प्रकाशन कोल्हापूर ,आवृत्ती 2010,
६. डॉ प्र. न.जोशी, ‘संत तुकारामांचे निवडक अभंग’, स्नेवर्धन पब्लिकेशन हाऊस पुणे प्रथम आवृत्ती १९९५.